**<u>ठळक बातम्या</u>**

- मराठीच्या मुद्द्यावर एकजूट कायम राखण्याचं राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचं आवाहन

- ठाकरे बंधूंच्या मेळाव्यात मराठी ऐवजी सत्तेची लालसा दिसून आल्याची भाजपा आणि शिवसेनेची टीका

- आषाढी एकादशीसाठी मोठ्या संख्येनं वारकरी पंढरपुरात दाखल, आरोग्य शिबिर, कृषी प्रदर्शनाचंही आयोजन

**आणि**

- तेंडूलकर - अँडरसन कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताकडे ४०० हून अधिक धावांची आघाडी

**<><><><><>**

मराठीच्या मुद्द्यावर राज्यातल्या सर्व नागरिकांनी पक्षीय मतभेद दूर करुन एकत्र यावं असं आवाहन राज आणि उद्धव ठाकरे यांनी आज केलं. मुंबईत वरळीत झालेल्या विजयी मेळाव्यात ते बोलत होते. राज ठाकरे यांच्या भाषणानं या मेळाव्याला सुरुवात झाली. ते म्हणाले

**- होल्ड - राज ठाकरे बाइट -**

राज्यातल्या जनतेला आधी भाषेवरून आणि नंतर जातीपातींमध्ये विभागण्याचा डाव असल्याचा दावा राज ठाकरे यांनी केला. बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांत ठाकरे इंग्रजी माध्यमातून शिकले होते, मात्र त्यांच्या मराठीच्या प्रेमावर कुणालाही शंका घ्यायला जागा नव्हती, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. भाषेचा अभिमान बाळगण्यासाठी कुठल्या भाषेत शिक्षण घेतलं हे महत्त्वाचं नाही, असं ते म्हणाले. त्याचवेळी भाषेच्या मुद्द्यावरुन उगाच मारहाण न करण्याचा सल्ला त्यांनी

कार्यकर्त्यांना दिला. भाषणाच्या शेवटी त्यांनी मराठी, मराठी भाषा, मराठी माणूस या मुद्द्यावर तडजोड होणार नाही, हे स्पष्ट केलं.

त्यानंतर भाषणाला आलेल्या उद्धव ठाकरे यांनी भाषणापेक्षा एकत्र दिसणं महत्त्वाचं आहे, असं म्हणून सुरुवात केली.

**- होल्ड - उद्धव ठाकरे -**

राजकारण्यांनी आतापर्यंत मराठी माणसांना वापरलं आणि फेकून दिलं. संकटात मराठी माणून एकत्र येतो आणि संकट गेल्यावर एकमेकांशी भांडतो, या पुढे अशा डावांना बळी पडू नका असं म्हणत सर्व पक्षातल्या मराठी माणसांनी एकत्र यावं असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी केलं.

आम्ही कुठल्याही भाषेच्या विरोधात नाही मात्र सक्तीच्या विरोधात आहेत. त्यामुळं कोणावर दादागिरी करणार नाही पण दादागिरी केली तर ती सहन करणार नाही, असा इशारा सुद्धा त्यांनी दिला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मराठीची सक्ती केली, मराठी भाषा भवनाचं भूमीपूजन केलं, या गोष्टी पुढे खोळंबल्या, असा दावा त्यांनी केला.

उद्धव आणि राज ठाकरे दोन्ही बाजूंनी व्यासपीठावर एकत्र दाखल झाले आणि उपस्थितांना अभिवादन केलं तेव्हा उपस्थितांनी जल्लोष केला. या मेळाव्याला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, आमदार जितेंद्र आव्हाड, शेकापचे जयंत पाटील, माकपचे अजित नवले, भाकपचे प्रकाश रेड्डी, राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर, माजी खासदार भालचंद्र मुणगेकर, मराठी अभ्यास केंद्राचे दीपक पवार, ठाकरे कुटुंबीय, मराठी चित्रपट सृष्टीतले अनेक नामवंत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सुमारे २० वर्षांनंतर ठाकरे बंधू व्यासपीठावर एकत्र आले असल्यानं राज्यभरातल्या नागरिकांनीही या मेळाव्याला गर्दी केली होती.

**<><><><><>**

विजयी मेळाव्यात मराठी ऐवजी सरकार गेल्याचं दुःख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केलं, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. गेल्या २५ वर्षात मुंबई महापालिकेत सत्ता असताना ते काहीही करू शकले नाही. तरी त्यांना पुन्हा सत्ता हवी असल्याचं फडणवीस म्हणाले. दोन्ही भावांना एकत्र आणल्याच्या मुद्द्यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली.

**- होल्ड - मुख्यमंत्री बाइट -**

**- <><><><><>**

मराठीच्या मुद्द्यावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले ही चांगली बाब असली तरी राजकीयदृष्ट्या त्यांचं मनोमिलन होईल का, हे बघणं महत्त्वाचं असल्याची प्रतिक्रिया अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. ते आज नाशिक इथे पत्रकारांशी बोलत होते.

**<><><><><>**

ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्यात मराठी भाषेच्या आडून द्वेष आणि आगपाखड दिसून आल्याची टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

**होल्ड बाईट - एकनाथ शिंदे**

या मेळाव्याच्या सुरुवातीला वाजलेल्या महाराष्ट्र गीताला राज्यगीताचा दर्जा आपण मुख्यमंत्री असतानाच मिळाला. तसंच, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाही महायुती सरकारनेच मिळवून दिल्याची आठवणही शिंदे यांनी यावेळी करून दिली.

**<><><><><>**

मराठीच्या मुद्द्यावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले ही चांगली बाब असली तरी राजकीयदृष्ट्या त्यांचं मनोमिलन होईल का , हे बघणं महत्त्वाचं असल्याची प्रतिक्रिया अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. ते आज नाशिक इथे पत्रकारांशी बोलत होते.

**<><><><><>**

आषाढी एकादशी सोहळा उद्या साजरा होणार आहे. यानिमित्तानं उद्या पहाटे विठ्ठल रुक्मिणीची मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा होणार आहे. या सोहळ्यासाठी हरिनामाचा जयघोष करत संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पंढरपूरच्या वेशीवर वाखरी इथं अवघ्या ७ किलोमीटर अंतरावर दाखल झाल्या आहेत. भाविकांना विठ्ठलाच्या भेटीची आतुरता लागली असून पंढरपुरात ५ लाखांपेक्षा जास्त वारकरी दाखल झाले आहेत. पंढरपुरात, नगर प्रदक्षिणा मार्ग, नामदेव पायरी, विठ्ठल मंदिर परिसर गर्दीनं फुलून गेला आहे. मंदिरामध्ये फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे.

आरोग्य विभागाच्या वतीनं भाविकांच्या आरोग्याची काळजी घेतली जात आहे. ठिकठिकाणी आरोग्य शिबिरं सुरू करण्यात आली आहेत. तसंच उपजिल्हा रुग्णालय, नगरपालिका प्राथमिक उपचार केंद्रातून सेवा देण्याचं काम सुरू आहे. चंद्रभागा नदीपात्रात स्नानासाठी येणार्या भाविकांच्या जीविताची काळजी घेण्यासाठी जीवरक्षक बोटी तैनात करण्यात आल्या आहेत. राज्य परिवहन महामंडळानं साडे पाच हजार जादा बसगाड्यांचं नियोजन केलं आहे.

**<><><><><>**

राज्यात कृषी क्षेत्रात दरवर्षी ५ हजार कोटी याप्रमाणे येत्या ५ वर्षात २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे, नानाजी देशमुख योजनेच्या माध्यमातून गावात संपूर्ण कृषी व्यवस्थापन करून लहानात लहान शेतकऱ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न सुरु आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पंढरपूरात कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर ते बोलत होते. कृषी प्रदर्शनातून माती परीक्षणापासून कापणीपर्यंतच्या तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्यानं या प्रदर्शनाचं महत्त्व अधिक असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शिक्षण क्षेत्रातल्या बहुमोल योगदानाबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यापन कारकीर्दही मोलाची आणि प्रेरणादायी असल्याचं सरन्यायाधीश भूषण गवई यांनी  म्हटलं आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्राध्यापक आणि प्राचार्य, कारकीर्दीला ९० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईतल्या शासकीय विधी महाविद्यालयात सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते आज स्मृतीपटलाचं अनावरण झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

भंडारा ते नागपूर या रस्त्याच्या सहापदरीकरणाचं काम पुढील चार महिन्यात सुरू होईल अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी आज भंडारा इथं केली.   राष्ट्रीय महामार्ग ५३ वरील भंडारा बायपास तसंच मौदा वाय जंक्शन इथल्या सहा पदरी उड्डाणपुलाचं लोकार्पण आज त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

अँडरसन - तेंडुलकर चषक क्रिकेट स्पर्धेतल्या, दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४ गडी बाद २४५ धावा झाल्या आहेत. त्यामुळं भारताकडे एकूण ४२५ धावांची आघाडी झाली आहे. केएल राहुल आणि ऋषभ पंत वेगवान अर्धशतक करुन बाद झाले. पहिल्या डावात द्विशतक ठोकणारा कर्णधार शुभमन गिल, रवींद्र जडेजासह सध्या खेळतो आहे.

इंग्लंडमध्ये बर्मिंगहॅमच्या एगबॅस्टन मैदानावर हा सामना सुरू आहे. पहिल्या डावाअखेर भारताकडे १८० धावांची आघाडी होती.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे माजी सार्वजनिक बांधकाममंत्री अशोक डोणगावकर यांचं आज सकाळी दीर्घ आजाराने निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात, तसंच नाशिक, कोल्हापूर आणि साताऱ्याच्या घाट परिसरात जोरदार पावसाची शक्यता असून, हवामान विभागानं या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. पुण्याच्या घाट परिसरात पुढले दोन दिवस अती जोरदार पावसाची शक्यता असून या ठिकाणी रेड अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><><>//**